जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2016
सकाळ

# डीकेटीईचे 'अभियांत्रिकी' देशात १२ व्या क्रमांकावर

## 'कॉम्पिटिशन सक्सेस रिव्ह्यू'च्या सर्व्हेतील निष्कर्ष



संग्रहित छायाचित्र

इचलकरंजी, ता. १८ : 'कॉम्पिटिशन सक्सेस रिव्ह्यू' या नामांकित मासिकाने घेतलेल्या देशव्यापी सर्व्हेत येथील प्रख्यात डीकेटीई संस्थेच्या टेक्स्टाइल ॲण्ड इंजिनिअरिंग संस्थेची गुणवत्तेवर आधारित देशातील सर्वोत्कृष्ट अभियांत्रिकी कॉलेजमध्ये १२ व्या क्रमांकावर निवड झाली. त्याचबरोबर डीकेटीई संस्था राज्यात ६ व्या क्रमांकावर असल्याचे जाहीर केले आहे.

नवी दिल्ली येथे मॅनेजमेंट आणि रिसर्च क्षेत्रात कार्यरत कॉम्पिटिशन सक्सेस रिव्ह्यू(सीएसआर) व ग्लोबल ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट सेंटर (जीएचआरडीसी) संस्थेने 'कॉम्पिटिशन सक्सेस रिव्ह्यू' या ख्यातनाम मासिकाच्या सहायाने इंजिनिअरिंग कॉलेजचे सर्वेक्षण केले. त्याअंतर्गत त्यांनी देशातील क्रमवारी व सर्व राज्याअंतर्गत क्रमवारी अशा दोन तालिका कॉम्पिटीशन सक्सेस रिव्ह्यूच्या जुलै - २०१६ विशेषांकात प्रसिद्ध केल्या. या क्रमवारीत डीकेटीईच्या टेक्स्टाइल ॲण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटला देशात १२ वा व महाराष्ट्रात ६ वा क्रमांक घोषित केला आहे. नुकतेच ॲटोनोमास स्टेटस मिळालेल्या या संस्थेने आता अखिल भारतीय पातळीवरील 'कॉम्पिटिशन सक्सेस रिव्ह्यू' या मॅगेझिनच्या क्रमवारीत चांगले मानांकन प्राप्त केले आहे.

सर्वेक्षणांतर्गत संस्थेची इमारत, प्राध्यापक, संशोधन, कन्सल्टन्सी, प्राध्यापकांची शैक्षणिक पात्रता, शोधनिबंध, पेटेन्टस, प्रवेश, अभ्यासक्रम, ज्ञानदान, प्लेसमेंट प्रशिक्षण, इंडस्ट्रीजबरोबर असलेले इन्स्टिट्यूटचे इंटरॲक्शन या मुद्यावर कामगिरी अभ्यासली.

यशामध्ये संस्थेतील प्राध्यापक व कर्मचारी यांच्याबरोबरच संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाणा आवाडे, माजी वस्त्रोद्योग मंत्री व उपाध्यक्ष प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ. सौ. सपना आवाडे, संस्थेचे प्राचार्य प्रा. डॉ. पी. व्ही. कडोले व संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचा सिंहाचा वाटा आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2016
लोकमत

# 'केआयटी' बनले अग्रणी महाविद्यालय

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने केआयटी महाविद्यालयाची तीन वर्षांसाठी अग्रणी महाविद्यालय म्हणून निवड केली आहे. याअंतर्गत विविध कार्यक्रम, उपक्रमांचे महाविद्यालय नेतृत्व आणि नियोजन करणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी यांनी दिली.

प्राचार्य डॉ. कार्जिनी म्हणाले, केआयटीला यापूर्वी सहा वर्षांसाठी अग्रणी महाविद्यालय म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. दहा ते पंधरा महाविद्यालयांना संघटित करून त्यांच्यासाठी विकास कार्यक्रम राबवून प्रगती साधण्याचे काम अग्रणी महाविद्यालयाच्या माध्यमातून केले जाणार आहे. याअंतर्गत महाविद्यालयातील क्रीडा, ग्रंथालय, आदी सुविधा देणे, मानव संसाधन विद्यार्थी-शिक्षकांसाठी विविध बौद्धिक व कौशल्यपूर्ण कार्यक्रम राबविणे, रोजगाराभिमुख उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्यासाठी विद्यापीठाकडे निधी उपलब्ध होणार आहे.

महाविद्यालयाचे समन्वयक म्हणून डॉ. आर. बी. हेद्दूर काम पाहणार आहेत. गेल्या ३४ वर्षांतील कामाची पोचपावती विद्यापीठाकडून आम्हाला अग्रणी महाविद्यालयाच्या जबाबदारीद्वारे मिळाली आहे. (प्रतिनिधी)

19 JUL 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

**शहरात उद्यापासून जनजागृती : पुराच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश**

# 'एनएसएस'चा आरोग्याचा जागर

प्रवीण देसाई • कोल्हापूर

पावसाळ्यात विशेषत: पुरानंतर डेंग्यू, मलेरिया, डायरिया साथीचे आजार पसरून आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. त्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने आरोग्याचा जागर करण्याची मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस)च्या विद्यार्थ्यांच्या मार्फत कोल्हापूर शहरात घराघरांत जाऊन प्रबोधन केले जाणार आहे. उद्या, बुधवार ते शुक्रवार या कालावधीत ही मोहीम सुरू राहणार आहे.

यंदा झालेल्या पावसाने पुराचे संकट ओढवले होते. हे पुराचे पाणी ओसरत चालले आहे; परंतु हे पाणी ओसरत असतानाच त्या परिसरात आरोग्याच्या समस्या निर्माण होऊन प्रसंगी साथीचे आजार पसरण्याचा धोका असतो. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांनी काही दिवसांपूर्वी शहरातील नागरिकांचे आरोग्यविषयक प्रबोधन करण्यासाठी मोहीम हाती घेण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस)च्या विद्यार्थ्यांकडून हे प्रबोधन करण्यास सांगितले आहे. त्यानुसार उद्या, बुधवारपासून शहरात ही मोहीम राबविली जाणार आहे. 'कीटकजन्य व जलजन्य रोगनियंत्रण जनजागरण' असे या मोहिमेचे नाव आहे.

शहरातील सर्व महाविद्यालयांच्या 'एनएसएस'चे विद्यार्थी यामध्ये सहभागी होणार आहेत. या विद्यार्थ्यांसोबत 'एनएसएस'चे कार्यक्रम अधिकारी, महापालिकेचे आरोग्य विभागातील अधिकारी, मुकादम असणार आहेत.

सकाळी ९ ते ११ या वेळेत सुरू राहणाऱ्या मोहिमेत प्रत्येक विद्यार्थ्याने किमान ५० घरांत जाऊन शहरवासीयांचे आरोग्यविषयक प्रबोधन करायचे आहे. शहरातील प्रत्येक वॉर्डांत हे विद्यार्थी जाणार आहेत. प्रत्येक कॉलेजवर वॉर्डांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तत्पूर्वी या विद्यार्थ्यांना महापालिकेच्या आरोग्य विभागासह संबंधित यंत्रणेकडून ही मोहीम कशी राबवायची याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार महापालिकेचे अधिकारी, सर्व महाविद्यालयांतील 'एनएसएस'चे कार्यक्रम अधिकारी यांची बैठक घेऊन निवासी उपजिल्हाधिकारी शंकर बर्गे यांनी ही मोहीम राबविण्यासंदर्भात योग्य त्या सूचना दिल्या आहेत. कोल्हापूरनंतर ही मोहीम इचलकरंजी येथेही राबविण्यात येणार आहे.



## असा होणार जागर

- पावसाळ्यात डेंग्यू, मलेरिया, डायरिया असे साथीचे आजार पसरून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. या आजारांची लक्षणे व प्रतिबंधात्मक उपाय यांबाबत हे विद्यार्थी घराघरांत जाऊन प्रबोधनपर माहितीपत्रक वाटणार आहेत.
- त्याचबरोबर घरात कोणी आजारी आहे का, याची माहितीही ते घेणार आहेत. पावसाळ्यात उघड्यावरील भांड्यात तसेच टायरमध्ये पाणी साठले आहे का ? याची पाहणीही ते करतील.
- टायर किंवा अशा भांड्यांमध्येच साथीचे आजार पसरविणाऱ्या डासांची निर्मिती होते. शहरवासीयांना हे विद्यार्थी पटवून देतील. दरम्यान, ठिकठिकाणी हे विद्यार्थी आरोग्य प्रबोधनपर पथनाट्यही सादर करणार आहेत.

---

19 JUL 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स



शिवाजी विद्यापीठ सेवक संघाच्यावतीने लोकविकास केंद्रासमोर फुलवलेली अमराई.

# कर्मचाऱ्यांनी फुलवली अमराई

Maruti.Patil
@timesgroup.com

ग्रीन कोल्हापूर

**कोल्हापूर :** कोणतेही शासकीय असो अथवा खासगी कार्यालय तेथे कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न आणि समस्या असतात. यासाठी आवाज उठवणाऱ्या संघटनाही असतात. त्यामुळे अशा संघटना नेहमीच आंदोलनाच्या माध्यमातून चर्चेत असतात. मात्र याला अपवाद ठरत शिवाजी विद्यापीठ येथील सेवक संघाने पर्यावरणाशी बांधिलकी जोपासत अनेक वृक्षांची लागवड केली आहे. त्यामुळे विद्यापीठ परिसर अनेक डौलदार वृक्षांनी बहरुन गेला आहे. लोकविकास केंद्रासमोरील अमराई लक्ष वेधून घेत आहे. चार वर्षांत बहरलेल्या अमराईमुळे ग्रंथालय परिसराला नैसर्गिक सौंदर्य लाभले आहे.

विद्यापीठ सेवक संघाने विद्यापीठाच्या विकासाला जास्तीत-जास्त प्राधान्य दिले आहे. त्यातूनच संघाने पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य देत परिसरात अधिकाधिक वृक्षलागवड करुन ती जतन करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

लोकविकास केंद्राच्या परिसरात नारळाची बाग तयार करण्यात आली होती. वृक्षांचे संवर्धन केल्याने डौलदारपणा आला होता. मात्र जमिनीखाली किडीचा प्रादुर्भाव वाढल्याने झाडे सुकू लागली. एकेक झाड खराब होत गेल्याने सर्वच बाग काढण्याचा निर्णय घेण्यात आला. नारळाची बाग काढल्यानंतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आंबे खाण्यासाठी उपलब्ध व्हावेत व डौलदार वृक्षाखाली बसून अभ्यासही करता यावा यासाठी २०१२ मध्ये येथे आंब्यांच्या पन्नासवर रोपांची लागवड करण्यात आली. सुरुवातीच्या काळात प्रत्येक कर्मचाऱ्यांना झाडे विभागून देऊन पाणी देण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. त्यानंतर बागेची जबाबदारी गार्डन सुप्रिंटेंडंट व माळी कर्मचाऱ्यांवर सोपवण्यात आली. नियमीत खते, पाणी व औषध फवारणी केल्याने वृक्षांनी डौलदार रुप धारणे केले आहे. विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच कर्मचाऱ्यांनी वृक्ष लागवडींवर विशेष केंद्रित केले आहे. त्यामुळे ग्रंथालय, गेस्ट हाउस, विद्यार्थिनी वसतिगृह ते संगीत विभागाच्या रस्त्याच्या दुर्तफा अनेक प्रकारची झाडे लावली आहेत. या मार्गावरील झाडे आता चांगली फुलली आहेत..

## उद्दिष्ट जांभूळ वन तयार करण्याचे

सेवक संघाच्या जडणघडणीत बाबा सावंत यांचे कार्य उल्लेखनीय होते. त्यामुळे सेवानिवृत्त होऊनही त्यांच्याबद्दल आजही सेवकांमध्ये आदराचे स्थान आहे. त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता म्हणून सावंत यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त अप्पासाहेब भवन समोरील वसतिगृह क्रमांक एक ते चार समोर ७५ जांभूळ वृक्षांची लागवड केली आहे. या रोपांचे संवर्धन आणि जतनासाठी विशेष आराखडा तयार केला आहे.